

सोलापूर महानगरपालिका कामगार
कल्याण जनसंपर्क विभाग
ई – न्यूजलेटर



सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून ICCC कमांड अँड कन्ट्रोल सेंटर येथे आज आयुक्त शीतल तेली-उगले यांनी भेट दिली.


Volume III Issue 05 Date 20-03-2023


सोलापूर महानगरपालिका व स्मार्ट सिटी च्या माध्यमातून ICCC कमांड अँड कन्ट्रोल सेंटर येथे आज महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी भेट देऊन कामकाजची पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त ज्योती भगत-पाटील, सहाय्यक आयुक्त गिरीष पंडित, नगर अभियंता सारिका आकुलवार, सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे,वाहन अधीक्षक नागनाथ मेंडगुळे, संगणक विभागाचे प्रमुख स्नेहल चपळगावकर मतीन सय्यद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.शहरातील नागरिकांच्या सोयीसाठी  व सुरक्षिततेसाठी संपूर्ण शहरातील सुरक्षा व्यवस्थेवर देखरेख व नियंत्रण करणेकामी  इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरच्या नियंत्रण कक्ष येते स्काडा प्रणाली, घंटागाडी रूट मॅप, शहरातील सीसीटीव्ही, सुरक्षा यंत्रणा, पाणीपुरवठा वितरणाचे कामकाजची पहाणी आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केली. शहरात स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत बसविणेत आलेल्या सीसीटीव्ही, एलईडी दिवे, कचरा संकलन केंद्राच्या गाड्या, पाणीपुरवठा वितरण प्रणाली व स्काड प्रणाली, ड्रेनेज बाबत तक्रारी,अग्निशमन विभाग,आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आल्याला तक्रारी नोंद घेण्यात येत आहे तसेच यावर एकाच ठिकाणाहुन देखरेख करण्यात येत आहे. या ठिकाणी नागरिकांकरीता सोलापूर मनपाकडील, पोलिसांकडील आवश्यकत्या सुविधाचे एकत्रीकरण करणेत आले आहे. या नियंत्रण कक्षामध्ये स्काडा प्रणालीचे नियंत्रण ही ठेवणेत आले असून त्याचे कामकाज सुरुळीत पणे सुरु आहे. तसेच शहरातील सुरक्षा व्यवस्था अबाधित राखणेकामी शहरातील 300 ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यात आले आहे. पोलीस विभागाच्या माध्यमातून या केंद्राच्या आधारे विविध प्रकारचे ट्राफिक दांडाचे चलन देण्यात येतं आहेत तसेच गुन्ह्यांच्या तपास कामीही यंत्रणना CCT Footage ची मदत होतं आहे. महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीने 190 घंटागाडाच्या मार्फत शहरातील एकूण 170 मार्गावरील कचरा संकलन करण्यात येत असून त्या सर्व मार्गांचे google map route mapping करण्यात आले असून त्याची देखरेख या इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर मधून होत आहे. तसेच यावेळी महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल येथे विविध विभागाचे कामकाज अधिक परिणामकरक करणे तसेच नव्या सेवा त्यात समाविष्ट करण्यासंदर्भात आवश्यकता सूचना यावेळी दिल्या.